विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ
नोंदणी क्रमांक - ५२८/८३ एफ - ४१२०

# सुधाकरपर्व

२०२५ - २०२६




NLC
राष्ट्रीय विधायक सम्मेलन भारत
CAPACITY ENHANCEMENT PROGRAM
for STATE LEGISLATORS of BHARAT 2025
Mahatma Gandhi (1869-1948)
An eye for an eye only ends up making
Mahatma Gandhi
Father of the Nation

## मार्गदर्शक



# श्री. व्ही. यू. डायगव्हाणे

माजी विधान परिषद सदस्य (१९९२ ते २०१०)

सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ, मुंबई

माजी सरकार्यवाह, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ

# सुधाकरपर्व

२०२५ - २०२६

संकल्पना / संपादन

**हितेश गोहोकार**

सहाय्य

**प्रभाकर पारखी**

**डॉ. विजय हेलवटे**

मुद्रितशोधक

**प्रा. प्रमोद उरकुडे**

प्रकाशक

**संपर्क कार्यालय, चंद्रपूर**


**-: संपर्क कार्यालय :-**

* **चंद्रपूर** : श्रीकृपा कॉलनी, जगन्नाथ बाबा नगर, दाताळा रोड, चंद्रपूर
* **नागपूर** : लक्ष्मी विहार कॉम्प्लेक्स, मेट्रो पिल्लर नं. ५४ जवळ, सोमलवाडा, नागपूर





२०२३ - २०२४




२०२४ - २०२५

# शुभेच्छा संदेश

सन १९४६ मध्ये विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाची स्थापना झाली. आज स्थितीत राज्यात सर्वात मोठी संघटना म्हणून कार्यरत आहे. आजवर संघटनेने अनेक आमदार दिलेत. २ फेब्रुवारी, २०२३ रोजी मा. सुधाकर अडबाले यांची पहिल्या क्रमांकाच्या मताधिक्याने निवड झाली. यापूर्वी संघटनेनी/प्रतिनिधींनी पुढील ऐतिहासिक ठळक कार्य केले. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या स्थापनेपासून संघटना व संघटनेचा आमदार प्रतिनिधी यांनी केलेल्या कार्याचा लाभ शिक्षक - कर्मचाऱ्यांना मिळत आहे.

संघटनेनी व प्रतिनिधींनी केलेले ठळक कार्य : स्कुल कोड बँकमार्फत वेतन, १९७७ चा ॲक्ट व १९८१ ची नियमावली, वेतन आयोगाच्या शिफारशी केंद्राप्रमाणे लागू करणे, पाचवा वेतन आयोग जशाचा तसा लागू करणे, विना अनुदानित शाळा व तुकड्यांना टप्प्याने अनुदान, डिसेंबर १९९५मध्ये एकाच वेळी ६०५ शाळांना व हजारो तुकड्यांना अनुदान मंजुर करणे, एम.सी.व्ही.सी., आय.टी.आय. निदेशकांना माध्यमिक शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी मंजूर करणे, शिक्षणसेवक मानधन वाढ, शिक्षक विरोधी शिफारशींची होळी करणे इ. मागण्या मंजूर करण्यास संघटनेला यश प्राप्त झाले. हीच संघटनेची ओळख आहे. यासाठी संघटनेला विविध प्रकारचे आंदोलन करावे लागले.

गेल्या १२ वर्षांचा बॅकलॉग मा. आमदार सुधाकर अडबाले यांचे नेतृत्वात विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ दूर करीत आहे. त्यांनी गेल्या ३ वर्षात संपूर्ण विदर्भ विभाग पिंजून काढत शिक्षणाधिकारी ते मंत्री पातळीवरील विविध मागण्या / समस्या निकाली काढण्यात यश मिळविले आहे. जुनी पेंशन योजना सुधारणा करणे शक्य झाले. तारांकित प्रश्न, लक्षवेधी, ९३च्या सुचना, औचित्याचे मुद्दे इत्यादी आयुधाद्वारे मागण्या निकाली काढल्या. शेकडो अनुकंपाची पदे भरली, नियुक्तीस मान्यता, वरिष्ठ व निवडश्रेणीची रिक्त पदे भरणे, पेन्शन केसेस इ. मागण्या मंजूर करण्यास यश मिळाले.

आपल्या व संघटनेच्या प्रशंसनीय कार्याचे प्रसारण करणारा "सुधाकरपर्व" या विशेषांकाचे प्रकाशन होत आहे. या नव्या उपक्रमासाठी व आमदार सुधाकरराव अडबाले यांना जन्मदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



**- व्ही. यू. डायगव्हाणे,** माजी शिक्षक आमदार
सरचिटणीस, म.रा. माध्यमिक शिक्षक महामंडळ

सुधाकरपर्व

# अनुक्रमणिका

"सुधाकरपर्व" ६
ध्येयवादी नेतृत्वाचा संघर्षमय प्रवास ७
विधिमंडळातील कामकाज १२
विधिमंडळात मांडलेले ठळक व महत्त्वाचे मुद्दे १४
विधिमंडळातील मागील एका वर्षातील पाठपुराव्याला आलेले यश १८
जुन्या पेन्शन योजनेसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा २३
समस्या तुमच्या, पुढाकार आमचा (२०२३-२४) २८
समस्या तुमच्या, पुढाकार आमचा (२०२४-२५) ३०
समस्या तुमच्या, पुढाकार आमचा (२०२५-२६) ३२
'ऑन द स्पॉट' मान्यता ३४
मंत्र्यांसह बैठक / अपघातग्रस्ताच्या मदतीला धावले ३८
विमाशि संघाचे कार्यतत्पर सरकार्यवाह ४०
शेगाव येथे विदर्भस्तरीय शिक्षक मेळावा ४३
सोशल मीडियावरील प्रतिक्रिया ४४
विकासकामे ४५
'रोजगार हमी योजना'सह चार समित्यांवर नियुक्ती ४६

आमदार सुधाकर अडबाले यांना फॉलो करण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

व्हाट्सॲपवर संपर्क साधण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

शिक्षकांचा आवाज हरपला



माजी आमदार

# प्रा. बी. टी. देशमुख

भावपूर्ण

श्रद्धांजली

शोकाकूल : विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ

संपादकीय

# "सुधाकरपर्व"



"शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी हेच आपले कुटुंब मानणारे." शिक्षकांचे हित हाच ध्यास मनी बाळगणारे. दिवस असो वा रात्र शिक्षकांचा फोन आला आणि सरांनी उचलला नाही, असे कधीही झाले नाही. त्यामुळे विदर्भातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या तोंडी एकच नाव दिसते आणि ते म्हणजे आमदार सुधाकर अडबाले. एका अल्पभूधारक शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या सुधाकर अडबाले सरांनी शिक्षक ते शिक्षक आमदार अशी किमया साधली आहे. सरांचा हा संघर्षमय प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. १० ऑगस्ट रोजी सरांचा वाढदिवस. सरांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मागील एका वर्षातील कार्याचा आढावा घेणारा "सुधाकरपर्व" हा विशेषांक प्रकाशित होत आहे.

घरची परिस्थिती जेमतेम होती. मात्र, आईवडिलांनी मुलांच्या शिक्षणात कुठेच कमी पडू दिले नाही. मोठे भाऊ - वहिनी यांच्या सानिध्यात सरांनी शिक्षण पूर्ण करून शिक्षकी पेशा स्वीकारला. शिक्षणासोबतच, समाजासाठी काहीतरी करण्याची त्यांची इच्छा होती. त्यांनी अनेक सामाजिक संस्थांमध्ये काम केले आणि लोकांसाठी मदत करत राहिले. कामातील प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रमांमुळे त्यांनी शिक्षकांची मने जिंकली व पुढे आमदार म्हणून निवडून आले. ते केवळ एक यशस्वी शिक्षक आणि आमदारच नाहीत तर ते एक आदर्श व्यक्ती आणि प्रेरणादायी नेते देखील आहेत. त्यांचे साधे जीवन, प्रामाणिकपणा, सहकार्यवृत्ती आणि कठोर परिश्रम हे अनेकांसाठी प्रेरणादायी आहेत.

सरांच्या वाढदिवसानिमित्त प्रकाशित होत असलेला "सुधाकरपर्व" हा विशेषांक त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा आहे. यात शैक्षणिक, सामाजिक व सर्वसामान्यांसाठी केलेल्या योगदानाचेही वर्णन आहे. आपल्या आयुष्यात अनेक अडचणींवर मात करत यशस्वी होण्याचा आदर्श त्यांनी दाखवून दिला आहे. त्यांचे विचार, कार्य व प्रेरणा पुढील पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरेल, हा आम्हाला विश्वास आहे.

**- प्रभाकर पारखी**




# ध्येयवादी नेतृत्वाचा संघर्षमय प्रवास

**गुरुवार, २ फेब्रुवारी २०२३ चा दिवस... नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ निवडणूक... दुपारी १२ वाजता न्यूज चॅनेलवर बातमी झळकली.... सुधाकर अडबाले सर मतमोजणीच्या प्रत्येक फेरीत आघाडीवर... हीच वार्ता बाहेर येत होती... जसजशी मतमोजणी सुरू होती, तस - तसा विमाशि संघाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढत होता... मतमोजणी केंद्राबाहेर दुपारी २ वाजल्यापासून बँड वाजू लागला... फटाके फूटू लागलेत... कार्यकर्ते नाचू लागले... जणू विजय आपलाच... शेवटी तो क्षण आलाच... रात्री ८ वाजता सुधाकर गोविंदराव अडबाले यांना विजयी घोषित करण्यात आले... विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा गड बारा वर्षांनंतर अविरत संघर्ष करून परत आणला ते कणखर, अभ्यासू, संघर्षशील नेतृत्त्व सुधाकर अडबाले यांनी.... तिथून सुरवात झाली ती सुधाकरपर्वाची...**

सुधाकर अडबाले यांनी बालपणापासूनच संघर्ष पाहिला आहे. चंद्रपूरजवळ असलेल्या मोठा मारडा या गावी अल्पभूधारक शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. साधारणतः शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या मुलांना जो संघर्ष सहन करावा लागतो, तो त्यांच्याही



वाट्याला आला. मात्र, शिक्षणाप्रती असलेल्या ओढीने त्यांची स्थिती बदलली. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत झाले. माध्यमिक आणि पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी वर्धा येथे मोठा भाऊ निळकंठराव अडबाले यांच्याकडे पूर्ण केले. ५ वी ते ७ वी लोक विद्यालय आणि ८ वी ते १० वीचे शिक्षण न्यू इंग्लिश हायस्कूल येथे झाले. ग्रामीण महाविद्यालयात १२ वी पूर्ण केली. जे. बी. विज्ञान महाविद्यालय वर्धा येथे विज्ञान विषयात पदवी संपादन केल्यानंतर चंद्रपूरच्या जनता महाविद्यालयातून बी.एड.ची पदवी प्राप्त केली. बी.एड. झाल्यानंतर ते लगेच २० जुलै १९८७ साली जनता विद्यालय, पिपरी येथे सहायक शिक्षक म्हणून रूजू झाले. त्यानंतर १९८८ मध्ये जनता विद्यालय, घुग्घुस येथे रूजू झाले. या विद्यालयात सुरू झालेला शिक्षकी पेशाचा प्रवास थेट ३१ ऑगस्ट २०१८ रोजी सेवानिवृत्तीपर्यंत सुरू राहिला.

शिक्षक म्हणून मुलांना घडविण्यासोबतच सामाजिक व सहकार क्षेत्रातही आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटविला. शिक्षण क्षेत्रातील शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या सबळ राहून कोणत्याही गरजेच्यावेळी त्यांना कुणासमोर हात पसरण्याची गरज पडणार नाही, हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून 'नागपूर विभाग शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्थे'ची स्थापना केली. सुधाकर अडबाले यांनी एक मोठे ध्येय निश्चित केले आणि त्यांची सुरुवात २००४ साली केली. अवघ्या १३ शाळा, १३९ सभासद आणि ४२ हजार रुपये भागभांडवलावर ही पतसंस्था त्यांनी सुरू केली. सुधाकर अडबाले यांनी लावलेल्या या इवल्याशा रोपट्याचे विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र आज नागपूर विभागातील ६ महसुली जिल्ह्यांपर्यंत विस्तारले आहे. पूर्व विदर्भात या पतसंस्थेच्या १६ शाखा असून ७७११ सभासद झाले आहेत

आणि पतसंस्थेचा टर्न ओव्हर ७५० कोटी रुपयांवर पोहोचला आहे. या पतसंस्थेचे आता अमरावती विभागात सुद्धा कार्यक्षेत्र सुरू झाले असून अमरावती जिल्ह्यात शाखा उघडण्यात आली आहे. अडचणीतील कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत देणे, त्यांची गरज भागविण्याचे काम संस्थेने केले आहे. सभासदाचे कोणत्याही कारणाने निधन झाल्यास त्यांच्याकडे असलेले १०० टक्के कर्ज माफ करणारी ही महाराष्ट्रातील एकमेव पतसंस्था आहे. कोरोनामध्ये निधन झालेल्या अनेक शिक्षक, शिक्षकेत्तर सभासदांचे १०० टक्के कर्ज संस्थेने माफ केले आहे. शिवाय राज्य शासनाला मदत म्हणून पतसंस्थेकडून १ लाख रुपयांचा मदत निधी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत देण्यात आला. संस्थेद्वारे विविध सामाजिक उपक्रमसुद्धा राबविले जातात. त्यामुळेच सर्व सभासदांना या संस्थेबद्दल आपलेपणाचा विश्वास निर्माण झाला आहे. हा विश्वास निर्माण करण्याचे श्रेय सुधाकर अडबाले यांच्या संकल्पना व व्यापक दृष्टीकोनाला जाते.

अडबाले यांचा वि.मा. शि संघटनेतील प्रवेशही त्यांच्या लढाऊ वृत्तीतूनच झाला. शिक्षकांसाठी अनेक आंदोलन करताना ते विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ या संघटनेशी जुळले. १९४६ पासून ही संघटना शिक्षकांसाठी काम करत आहे. १९८८ साली सुधाकर अडबाले संघटनेचे आजीवन सभासद झाले. १९९८ साली ते चंद्रपूर जिल्हा संघटक व २००२ मध्ये त्यांची जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. २५ ऑक्टोबर २०१५ मध्ये त्यांना प्रांतीय सरकार्यवाह या पदावर जबाबदारी देण्यात आली. या पदावर ते आजतागायत कार्यरत आहेत. २१ मार्च २०२१ रोजी संघटनेच्या ध्येयधोरणानुसार लोकशाही पद्धतीने नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाच्या २०२२-२३ च्या निवडणुकीसाठी अधिकृत उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. अडबाले परिवारात कुणी साधा ग्रामपंचायत सदस्यही झाला नसताना नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाची प्रतिष्ठेची ही निवडणूक त्यांनी पहिल्या फेरीतच विक्रमी मतांनी जिंकली. हे त्यांनी केलेल्या कार्याचे फलित होय.

संघटनेच्या माध्यमातून विद्यार्थी, पालक, शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सुधाकर अडबाले यांचे प्रयत्न सातत्याने सुरूच आहे. १ नोव्हेंबर २००५ नंतर लागलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन



योजना लागू होईपर्यंत सभागृहात व सभागृहाबाहेरही त्यांचा लढा सुरूच राहील, असा त्यांचा निर्धार आहे. पूर्व विदर्भातील सहाही जिल्ह्यांमध्ये त्यांचा दांडगा शिक्षक संपर्क आहे आणि गेल्या ३७ वर्षांपासून संघटनेच्या कार्याचा अनुभव त्यांच्याकडे आहे. या अनुभवाला आमदारकीची जोड मिळाली आहे. ८ फेब्रुवारी २०२३ रोजी जुन्या पेंशनची टोपी आणि दुप्पटा घालून विधानपरिषद सदस्य पदाची शपथ घेतली. विधान परिषदेच्या निवडणुकीत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेले शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांची विधान परिषदेच्या सभागृहातील पहिलीच एन्ट्री ही प्रभावी ठरली. सभागृहात पहिल्यांदाच गेलेले शिक्षक आमदार अडबाले यांनी शिक्षकांच्या समस्यांकडे सभागृहाचे लक्ष वेधले. प्रश्नांची केलेली मांडणी पाहून खुद्द सभापती डॉ. नीलम गोन्हे यांनी त्यांचे कौतुक केले. आमदार अडबाले हे शिक्षकांसह सर्वसामान्यांच्या प्रश्नांना घेऊन किती गंभीर आहे हे, त्यांच्या गेल्या आठ अधिवेशनात सभागृह व राज्याने बघितले आणि पुढेही बघत राहीलच, यात तीळमात्र शंका नाही.

आमदार सुधाकर अडबाले सर निवडणुकीपूर्वी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह म्हणून विदर्भातील अकरा जिल्ह्यात नेहमीच दौऱ्यावर असायचे. शिक्षकांच्या समस्यांना घेऊन आंदोलने, बैठका, मोर्चे हे सुरुच असायचे. आपण नेहमी बघतो की, आमदार झाल्यावर लोक थांबतात. पण हे पहिले आमदार असतील जे निवडून येण्याआधी जसे फिरत होते तसेच निवडून आल्यानंतरदेखील सतत फिरत आहेत. आज आमदार अडबाले यांना निवडून येऊन साडेतीन वर्षांचा कालावधी होतोय. एकही दिवस ते घरी नाहीत. सतत नागपूर, अमरावती विभागातील ११ ही जिल्ह्यांत न थकता, न थांबता शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी प्रयत्नरत आहेत.

एका अल्पभूधारक शेतकरी कुटूंबात जन्म ते शिक्षक आमदार हा त्यांचा ६६ वर्षांचा संघर्षमय प्रवास, आज अनेकांसाठी प्रेरणादायी असाच आहे. आज १० ऑगस्ट २०२६ रोजी त्यांचा वाढदिवस. त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने मागील एका वर्षातील कार्याचा आढावा घेणारा 'सुधाकरपर्व' हा विशेषांक.

आदरणीय आमदार श्री. सुधाकर अडबाले सर यांना वाढदिवसानिमित्त उदंड आयुष्याच्या अनंत कोटी शुभेच्छा!

**- हितेश गोहोकार,**
स्वीय सहायक




उमेदवार


निवडणूक प्रचार



सुधाकरपर्व

# विधिमंडळातील कामकाज

| | | |
|---|---|---|
| एकूण अधिवेशन **11** | एकूण अधिवेशनाचे दिवस **137** | एकूण उपस्थिती **137** |
| लक्षवेधी सूचना **70** | सादर केलेले तारांकित प्रश्न **290** | स्वीकृत झालेले तारांकित प्रश्न **101** |
| सादर केलेले अशासकीय ठराव **19** | सादर केलेले विशेष उल्लेख **65** | सादर केलेले औचित्याचे मुद्दे **21** |

सभागृहातील पहिल्या भाषणाचा संपूर्ण व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा












# विधिमंडळात मांडलेले ठळक व महत्त्वाचे मुद्दे

**राज्यातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत** प्रत्येक अधिवेशनात आग्रही मागणी

**नागपूर जिल्ह्यातील ६३२ प्राथमिक शिक्षकांचे वेतन अदा करण्याबाबत** अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ मध्ये मागणीला यश

**विदर्भातील तापमान बघता सत्र २०२६-२७ शाळा दि. ३० जून २०२६ पासून सुरु करण्याबाबत** पावसाळी अधिवेशन २०२६ मध्ये मागणी

**राज्यातील शिक्षकांना १०, २०, ३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना तत्काळ लागू करण्याबाबत** प्रत्येक अधिवेशनात आग्रही मागणी

**शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित शालार्थ आयडीबाबत** हिवाळी २०२५, अर्थसंकल्पीय/पावसाळी अधिवेशन २०२६ मध्ये सतत मागणी

**नक्षलग्रस्त / आदिवासी भागातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १५% प्रोत्साहन भत्ता ६ व ७ व्या वेतन आयोगानुसार मिळण्याबाबत** अधिवेशनात सतत मागणी

**प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) भंडारा व वेतन पथक अधीक्षक (माध्य.) भंडारा यांच्या नियमबाह्य व अनियमितता प्रकरणाबाबत** हिवाळी अधिवेशन २०२५ मध्ये मागणी

**राज्यातील शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करण्याबाबत** अधिवेशनात सतत मागणी

**अनुदानित आदिवासी आश्रम शाळेतील माध्यमिक शिक्षकांना ग्रेड वेतन ४८०० रुपये लागू करण्याबाबत.**
अधिवेशनात सतत मागणी

**राज्यातील शिक्षकांना पूर्वलक्षी प्रभावाने टीईटी परीक्षा सक्ती न करण्याबाबत**
अर्थसंकल्पीय / पावसाळी अधिवेशन २०२६ मध्ये मागणी

**दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर नगर पालिका / महानगरपालिका सेवेत रूजू झालेल्या शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पेंशन योजना लागू करण्याबाबत**
अधिवेशनातील मागणीला यश

**नागपूर खंडपीठाने दिलेल्या निकालानुसार शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागू करण्याबाबत**
अधिवेशनात सतत मागणी

**राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (ITI) गटनिदेशकांना प्राचार्य पदी पदोन्नती देण्याबाबत.**
अधिवेशनात मागणी

**इंग्रजी (सीबीएसई) माध्यमाच्या शाळेतील शिक्षक - कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन देण्याबाबत** अधिवेशनात सतत मागणी

**राज्यातील खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेशित २५ टक्के विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती अदा करण्याबाबत**
प्रत्येक अधिवेशनात आग्रही मागणी

**शासन निर्णय दि. ६ फेब्रुवारी २०२३ नुसार टप्पा वाढ अनुदानास अपात्र ठरलेल्या शाळा / तुकड्यांना टप्पा वाढ अनुदान मंजूर करण्याबाबत.**
अधिवेशनात सतत मागणी

**राज्यातील बिगर नेट-सेट प्राध्यापकांना CAS अंतर्गत पदोन्नती देणेबाबत**
पावसाळी अधिवेशन २०२६ मध्ये मागणी

**दिनांक २५ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयात सैनिकी शाळेचा टप्पावाढीसाठी समावेश करण्याबाबत.** अधिवेशनात सतत मागणी

# विधिमंडळात मांडलेले ठळक व महत्त्वाचे मुद्दे

**गडचिरोली येथे सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालयाची निर्मिती करण्याबाबत.**
प्रत्येक अधिवेशनात मागणी

**अपात्र झालेल्या खाजगी शाळा / तुकड्यांबाबतचा दि. १ व २ एप्रिल २०२६ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत** पावसाळी अधिवेशन २०२६ मध्ये मागणी

**आदिवासी उपयोजन क्षेत्रातील (1901) शाळा / तुकडीवर कार्यरत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित करण्याबाबत**
अधिवेशनात मागणी / पाठपुरावा

**समग्र शिक्षा अंतर्गत करार तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत**
अर्थसकल्पीय / पावसाळी अधिवेशन २०२६ मध्ये मागणी

**DCPS/NPS खाते नसलेल्या शिक्षक-कर्मचाऱ्यांना सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचे प्रलंबित सर्व हप्ते तत्काळ अदा करण्याबाबत** अधिवेशनात सतत मागणी

**वर्ग ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया रद्द करण्याबाबत**
अर्थसकल्पीय / पावसाळी अधिवेशन २०२६ मध्ये मागणी

**बिगर नेट/सेट प्राध्यापकांना जूनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत**
अधिवेशनात सतत मागणी

**महाराष्ट्र शासनाच्या महाज्योती, बार्टी योजना अंतर्गत आचार्य पदवी (Ph.D.) संशोधन कार्यासाठी शिष्यवृत्तीसंदर्भात जाहिरात काढण्याबाबत** पावसाळी अधिवेशन २०२६ मध्ये मागणी


धरणे...
धरणे आंदोलन
धरणे...
१) टप्पा अनुदान शाळांना, अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद करा
२) दि.१ नोव्हेंबर २००५ पुर्विच्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागु करा
३) संच मान्यतेचा जाचक जीआर रद्द करा
४) समग्र शिक्षा अभियानातील कर्मचारी यांना कायम करा.





# विधिमंडळातील मागील एक वर्षातील पाठपुराव्याला आलेले यश

## नागपूर जिल्ह्यातील ६३२ शिक्षकांच्या नियमित वेतनाचा मार्ग मोकळा



नागपूर जिल्ह्यातील खासगी प्राथमिक शिक्षकांचे माहे एप्रिल २०२५ पासून वेतन काम करीत असताना देखील थकीत होते. उच्च न्यायालयाने दोन आठवड्यांच्या आत सदर शिक्षकांचे वेतन अदा करण्याबाबत आदेश पारीत केलेले असतानाही शासनाकडून सदर शिक्षकांचे वेतन अदा केलेले नसल्याने अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ मध्ये आमदार सुधाकर अडबाले यांनी १० मार्च २०२६ रोजी तारांकीत प्रश्नाद्वारे ६३२ प्राथमिक शिक्षकांचे थकीत वेतन अदा करण्याबाबत मागणी लावून धरली. त्यानंतर १८ मे २०२६ रोजी शिक्षण संचालक (प्राथ.) पूणे यांनी माहे मे २०२६ पेड इन जून २०२६ पासूनचे नियमित वेतन अदा करण्याची तात्काळ कार्यवाही करण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प. नागपूर यांना पत्र दिले. त्यामुळे सदर शिक्षकांचा नियमित वेतनाचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच थकीत वेतनासाठी आमदार सुधाकर अडबाले यांचा पाठपुरावा सुरू आहे.

सभागृहातील प्रश्नाचा व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

## अखेर १४ अंशतः अनुदानित शाळांना टप्पावाढ अनुदान मंजूर

चंद्रपूर जिल्ह्यातील १४ अंशतः अनुदानित शाळांची संचमान्यता न झाल्याने दीड वर्षांपासून वाढीव टप्पावाढ अनुदानापासून वंचित राहिल्या होत्या. याची दखल घेत आमदार सुधाकर अडबाले यांनी विशेष प्रयत्न करून १४ शाळांच्या संचमान्यता दुरुस्ती करून दिल्या. त्यानंतर सदर शाळांना वाढीव टप्पावाढ अनुदान मंजूर झाले आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन सुरु झाले. याबद्दल सदर शाळांतील कर्मचाऱ्यांनी आमदार सुधाकर अडबाले यांची निवासस्थानी भेट घेऊन आभार मानले.

## अतिरिक्त शिक्षक समायोजन संचमान्यता २०२४-२५ ऐवजी २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार होणार

महाराष्ट्रातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समायोजन दि. ५ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश मा. शिक्षण संचालक यांनी दिलेले होते. राज्यातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता २०२४-२५ च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन रद्द करून २०२५- २६ ची संचमान्यता निर्गमित झाल्यानंतर अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया राबविण्यात यावी, याबाबत आमदार श्री. सुधाकर अडबाले यांनी शासनाकडे मागणी लावून धरली. याची दखल घेत. मा. आयुक्त (शिक्षण) पूणे यांनी सन २०२५- २६ ची संचमान्यता निर्गमित झाल्यानंतरच समायोजन प्रक्रिया करणे योग्य असल्याबाबत दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी पत्र काढले.

## ग्रंथपालांचे अर्जित रजा रोखीकरण लाभ अखेर मंजूर

नागपूर विभागातील खाजगी माध्यमिक अनुदानित शाळेतील ग्रंथपाल यांचा अर्जित रजा रोखीकरण बाबतचा प्रस्ताव कित्येक महिन्यापासून प्रलंबित होता. माननीय आमदार श्री. सुधाकर अडबाले यांनी या प्रकरणात लक्ष घालून मा. शिक्षण आयुक्त पूणे, शिक्षण संचालक पूणे व शिक्षण उपसंचालक नागपूर यांचेकडे या प्रकरणाचा निपटारा करण्याबाबत कसोशीचे प्रयत्न केलेत व संपूर्ण विदर्भातील खाजगी माध्यमिक अनुदानित शाळेतील समस्त ग्रंथपालांना रजा रोखीकरणाचा लाभ मिळवून दिला. याबाबतचे शिक्षण उपसंचालक नागपूर यांनी दि. ४ सप्टेंबर २०२५ रोजी पत्र काढून विभागातील अधिकाऱ्यांनी निर्देशित केले. याबद्दल आमदार श्री. सुधाकर अडबाले सर यांचे आणि विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे संपूर्ण नागपूर विभागातील समस्त ग्रंथपालांनी आभार व्यक्त केले.

## ९-१० करिता ३ शिक्षक अनुज्ञेय

वर्ष २०२५-२६ च्या संचमान्यतेत ९-१० दोन्ही वर्गांची एकत्रित पटसंख्या २० किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास ३ शिक्षक अनुज्ञेय करण्याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी सभागृहातील तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून मागणी केली होती. त्यानुसार उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांनी दि. ११ मे २०२६ रोजी आयुक्त (शिक्षण) पूणे यांना पत्र काढून शासन निर्णय दि. १५ मार्च २०२४ मधील तरतुदीनुसार गट ९-१० करिता ग्रामीण भागासाठी वर्ष २०२५-२६ ची संचमान्यता करताना दोन्ही वर्गांची एकत्रित पटसंख्या २० किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास ३ शिक्षक अनुज्ञेय करण्यात यावेत, असे कळविले.

## नागपूर न्यायाधिकरण येथे पीठासीन अधिकारी नियुक्त

नागपूर येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथील पीठासीन अधिकारी पद गेल्या १८ महिन्यांपासून रिक्त होते. याबाबत मा. उच्च शिक्षणमंत्री, सचिव यांच्याकडे नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी सतत पाठपुरावा केल्यानंतर विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथे नियमित पीठासीन अधिकारी नियुक्त करण्यात आले. पीठासीन अधिकारी पदावर न्यायमूर्ती श्रीमती मुकुलिका श्रीकांत जवळकर (मा. उच्च न्यायालय, मुंबई) यांची तीन वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात येत असल्याचा शासन निर्णय २७ एप्रिल २०२६ रोजी निर्गमित करण्यात आला. पिठासीन अधिकारी नियुक्त केल्यामुळे खाजगी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी आमदार सुधाकर अडबाले यांचे आभार मानले.

## रात्रशाळा अर्धवेळ मुख्याध्यापकाला पूर्णवेळ मुख्याध्यापक पदाची मान्यता

नागपूर शहरातील रात्र शाळेतील अर्धवेळ मुख्याध्यापक पदाला पूर्णवेळ मुख्याध्यापक पदाचा दर्जा मिळण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती व ते वर्षभरापासून वेतनापासून सुद्धा वंचित होते. आमदार सुधाकर अडबाले यांनी ही मागणी सभागृहात लावून व शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी (माध्य.) नागपूर यांचेकडे पाठपुरावा करून रात्रपाळी शाळा अर्धवेळ मुख्याध्यापक पदाला पूर्णवेळ मुख्याध्यापक पदाची मान्यता मिळवून दिली व त्यांना न्याय मिळवून दिला. त्याबद्दल रात्रशाळा मुख्याध्यापकांनी आमदार अडबाले यांचे आभार मानले.

## आश्रम शाळा दहातोंडा येथे प्रशासक नियुक्त

मूर्तिजापूर तालुक्यातील श्रीमती सीताबाई राठोड प्राथमिक आश्रम शाळा दहातोंडा येथील वसतीगृह दि. ०९.११.२०२२ पासून जाणीवपूर्वक बंद ठेवण्यात आले होते. त्यामुळे शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ चे उल्लंघन तर झालेच त्यासोबतच विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील गोरगरीब विद्यार्थ्यांचे अपरिमित असे शैक्षणिक नुकसानही झाले. सोबतच कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास व आर्थिक भुर्दंड सोसावा लागला. यासंबंधी न्याय मिळावा म्हणून आश्रम शाळेच्या एकूणच सर्व अनियमिततेबाबतची तक्रार कर्मचाऱ्यांनी शासनाकडे केली. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह तथा नागपूर शिक्षक मतदार संघाचे लोकप्रिय आमदार सुधाकर अडबाले हे एका देवदूताप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. त्यांनी कर्मचाऱ्यांची विद्यार्थ्यांप्रती असणारी बांधिलकी व त्यांचा प्रामाणिक हेतू लक्षात घेऊन कर्मचाऱ्यांच्या समस्या मंत्र्यांपासून सचिवांपर्यंत पोटतिडकीने मांडल्या आणि त्याचा शेवटपर्यंत पाठपुरावा केला. त्याचेच फलित म्हणून श्रीमती सीताबाई राठोड प्राथमिक आश्रम शाळा दातोंडा येथे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली.

## सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता लागू

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील नक्षलग्रस्त तसेच अतिसंवेदनशील म्हणून घोषित केलल्या भागात मुख्यालय असलेल्या कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांना सुधारीत दराने प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे. परंतु, गडचिरोली प्रकल्पाअंतर्गत सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता लाभ देण्यात आला नसल्याने मा. सचिव यांना ३० मे २०२६ रोजी आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना ६/७ व्या वेतन आयोगातील मूळ वेतनावर १५ टक्के इतका किमान रुपये २०० व कमाल रुपये १५०० दरमहा या मर्यादेत सुधारीत दराने प्रोत्साहन भत्ता अदा करण्याबाबत मागणी केली होती. त्यानुसार आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांनी अपर आयुक्त, नागपूर यांना सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना देखील प्रोत्साहन भत्ता अदा करण्याची कार्यवाही करण्याबाबत दि. ४ जून २०२६ रोजी पत्र काढून सूचना केल्या.

## शासकीय आश्रमशाळा दीर्घकालीन सुट्टया कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरण अनुज्ञेय

आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रमशाळांवरील दीर्घकालीन सुटी विभागातील कर्मचाऱ्यांना अर्जित रजा रोखीकरण लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचे आदिवासी विभागाचे शासन परिपत्रक दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी निर्गमित झाल्याने सेवानिवृत्त झालेल्या शासकीय आश्रमशाळांवरील दीर्घ सुटी विभागातील कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यासाठी आमदार सुधाकर अडबाले यांनी सचिवांपासून मंत्र्यांपर्यंत सतत पाठपुरावा करून लाभ मिळवून दिला. यामुळे सदर आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांनी आमदार श्री. सुधाकर अडबाले सरांचे आभार मानून त्यांचा सत्कार केला. यावेळी आमदार अडबाले यांनीही सदर कर्मचाऱ्यांच्या पाठीशी नेहमी उभे राहणार असल्याचे सांगितले.

## २०२५-२६ च्या संच मान्यतेसाठी २० ऑक्टोबर रोजीचा विद्यार्थी पट ग्राह्य धरणार

शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी यु डायस प्लस मध्ये शिक्षक - शिक्षकेत्तर संच निर्धारणासाठी विद्यार्थी पट ग्राह्य धरण्याच्या तारखेस मुदतवाढ मिळण्याबाबत आमदार श्री. सुधाकर अडबाले यांनी शासनाकडे पाठपुरावा केला. याची दखल घेत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे उपसचिव यांनी दि. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी संच मान्यता निर्धारणासाठी ३० सप्टेंबर रोजीच्या आधार प्रमाणित विद्यार्थी संख्येऐवजी २० ऑक्टोबर रोजीची आधार प्रमाणित विद्यार्थी संख्या विचारात घेण्यात यावी, असे पत्र काढले. त्यामुळे शैक्षणिक सत्र २०२५- २६ मध्ये हजारो शिक्षक अतिरिक्त होण्याचे टळले.

## विकल्प भरण्यास मुदतवाढ व कार्यपद्धती जाहिर



सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेची कार्यपद्धती जाहिर करावी व कार्यपद्धती निश्चित होईपर्यंत विकल्प भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ दरम्यान आमदार सुधाकर अडबाले यांनी वित्त विभागाच्या प्रधान सचिव डॉ. रिचा बागला यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे दि. ११ मार्च २०२६ रोजी मागणी केली होती. त्यानुसार वित्त विभागाने ३० मार्च २०२६ रोजी शासन निर्णय काढून विकल्प भरण्यास ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यानंतर सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना (RNPS)ची कार्यपद्धती ६ मे २०२६ रोजी जाहिर करण्यात आली.

## अहेरी प्रकल्पातील शिक्षकांच्या वेतनवाढीस मंजुरी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अहेरी (जि. गडचिरोली) कडून शिक्षक क्षमता चाचणी परिक्षेला प्रकल्पातील शिक्षक - कर्मचारी उपस्थित राहिले नसल्याने तत्कालिन प्रकल्प अधिकारी श्री. वाघमारे यांनी काही शिक्षकांच्या दोन तर काही शिक्षकांच्या तीन अशाप्रकारे २१६ शिक्षकांच्या वेतनवाढी कायमस्वरूपी थांबविण्याचे आदेश दिलेले होते. त्यामध्ये आमदार श्री. सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने शिक्षकांनी मा. अप्पर आयुक्त नागपूर यांच्या कडे अपील दाखल केली. त्यानंतर २०८ शिक्षकांना वेतनवाढी पूर्ववत करण्याचे आदेश मा. अप्पर आयुक्त नागपूर यांनी बैठकीत दिले. उर्वरित ८ शिक्षकांनी अपील दाखल केल्यानंतर प्रकल्प कार्यालयाने प्रकरणाची शहानिशा करुन ७ शिक्षकांना न्याय मिळाला आहे. फक्त अनुदानित आश्रमशाळेतील एक शिक्षक सदर लाभापासून वंचित राहिला आहे.

## शिक्षकांच्या प्रतिनियुक्ती आदेश रद्द

चंद्रपूर जिल्ह्यातील हायस्कूल येथे पदे रिक्त असल्याने जि.प. उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षक/विषयतज्ञ यांची अध्यापन करण्याकरिता तात्पुरती प्रतिनियुक्ती देण्यात आली होती. यावर आमदार अडबाले यांनी सदर प्रतिनियुक्ती रद्द करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. चंद्रपूर यांना पत्र देऊन मागणी केली. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी २४ जुलै २०२६ रोजी पत्र काढून सदर प्रतिनियुक्ती आदेश रद्द केले.



दिल्ली
०१.१०.२०२३

# जुन्या पेन्शन योजनेसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा

* १ नोव्हेंबर २००५ नंतर लागलेल्या व टप्याटप्याने १०० टक्के अनुदानावर आलेल्या शाळांतील कार्यरत शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी व राज्य कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागणीसाठी सुधाकर अडबाले यांनी आमदार होण्यापूर्वीपासूनच आग्रही भूमिका घेत सातत्याने लढा दिला. दि. २७ डिसेंबर २०२२ रोजी नागपूर हिवाळी अधिवेशनादरम्यान काढण्यात आलेल्या भव्य मोर्चात ते सहभागी झाले होते.

* जानेवारी २०२३ मध्ये झालेल्या नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणूकीत महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे पुरस्कृत उमेदवार म्हणून सुधाकर अडबाले यांनी निवडणूक लढविली आणि विक्रमी मतांनी विजयी झाले. दि. ८ फेब्रुवारी २०२३ रोजी जुन्या पेन्शनची टोपी आणि दुपट्टा घालून विधानपरिषद सदस्य पदाची शपथ घेतली. तेव्हापासून प्रत्येक अधिवेशनात जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत आग्रही भूमिका ते सभागृहात मांडत आहेत.

* १४ मार्च २०२३ पासून सुरु झालेल्या आंदोलनाची माहिती पहिल्याच अधिवेशनात १५ मार्च २०२३ रोजी सभागृहात दिली आणि मागणी लावून धरली. पेन्शन फायटर्सच्या आंदोलनाची दखल घेत वित्त विभागाने काढलेल्या दि. ३१ मार्च २०२३च्या कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान मिळण्याबाबतच्या शासन निर्णयाच्या अंमलबजावणी संदर्भात कार्यपद्धती व शालेय शिक्षण, ग्रामविकास व इतर विभागाचा स्वतंत्र

रामलिला मैदानावर केलेल्या भाषणाचा व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा




शिर्डी

१५ सप्टेंबर २०२४

सभागृहातील जुनी पेंशनबाबत व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा केला. त्यानंतर शालेय शिक्षण विभागाचा १४ जून २०२३ रोजी स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

* १ ऑक्टोंबर २०२३ रोजी रामलिला मैदान, दिल्ली येथे झालेल्या पेन्शन शंखनाद महारॅलीमध्ये देशभरातील विविध राज्यांतून जवळपास १० लाख पेंशन फायटर्स सहभागी झाले होते. या विराट महारॅलीत जुनी पेन्शन योजना लागू होईपर्यंत आपण स्तब्ध बसणार नाही, असा निर्धार पेन्शन शंखनाद महारॅलीमध्ये आमदार सुधाकर अडबाले यांनी संबोधित करताना केला.

* १२ डिसेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने हिवाळी अधिवेशनादरम्यान आयोजित पेन्शन जनक्रांती महामोर्चास यशवंत स्टेडियम, नागपूर येथे उपस्थित राहून पेन्शन फायटर्संना संबोधित केले.

* दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व १ नोव्हेंबर २००५ नंतर टप्पाटप्प्याने १०० टक्के अनुदानावर आलेल्या राज्यभरातील सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना व १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या राज्यातील सर्व शिक्षक व राज्य कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी २७ फेब्रुवारी २०२४ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्याकडे केली.

* मा. मुख्यमंत्र्यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशन २०२३ मध्ये सभागृहात २६ हजार कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे मान्य केले होते. २ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयात दि. ०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रूजू झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे. मात्र, सदर






वर्धा १ ऑक्टोबर २०२४

शासन निर्णयात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना डावलण्यात आल्याने सदर कर्मचाऱ्यांवर झालेला मोठा अन्याय असल्याचे पावसाळी अधिवेशनात ११ जुलै २०२४ रोजी शासनाचे लक्ष वेधले. तसेच दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयावर सर्व विभागाने स्वतंत्र शासन निर्णय काढण्याबाबत पाठपुरावा केला.

✻ १५ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने शिर्डी येथे आयोजित पेन्शन राज्य महाअधिवेशनास उपस्थित राहून राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले पेन्शन फायटर्स यांना मा. उध्दवजी ठाकरे, मा. नानाभाऊ पटोले यांच्यासह आमदार सुधाकर अडबाले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी खासदार व आमदारांनी हजेरी लावली होती.

✻ २ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना च्या वतीने १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी महात्मा गांधीजी यांच्या जयंतीपासून वर्धा येथे आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते. या उपोषणास भेट देऊन मार्गदर्शन केले. त्यानंतर पून्हा ५ ऑक्टोबर २०२४ रोजी या उपोषणास भेट देऊन उपोषणकर्त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. उपोषणाचा पाचवा दिवस असून १७ पेन्शन शिलेदार आमरण उपोषण करीत असून काहींची प्रकृती खालावल्यानंतरही शासनाच्या वतीने दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे शासनाची भूमिका स्पष्ट करा अन्यथा 'रास्ता रोको' आंदोलन केले जाईल, असा इशारा देताच जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रतिनिधी म्हणून पाठविले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनाची भूमिका मांडून शासनाकडे आपल्या मागण्यांबाबत सकारात्मक अहवाल पाठविला जाईल, आपण उपोषण थांबवा, अशी विनंती केली. त्यानंतर राज्याध्यक्ष वितेश खांडेकर यांच्या नेतृत्वात उपोषणकर्त्यांनी निर्णय घेऊन आमरण उपोषण स्थगित करण्यात आल्याचे जाहीर केले. त्यानंतर आमदार सुधाकर अडबाले यांनी स्वतः सर्व उपोषणाकर्त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात नेऊन त्यांची तपासणी करवून घेतली.

✻ हिवाळी अधिवेशन २०२४ मध्ये १८ डिसेंबर २०२४ रोजी

सभागृहातील व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

१ नोव्हेंबर २००५ रोजी नियुक्त व त्यानंतर टप्याटप्याने १०० टक्के अनुदानावर आलेल्या राज्यातील शिक्षक - शिक्षकेत्तर व राज्य कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, याबाबत शासनाचे लक्ष वेधले.

* अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ मध्ये दि. १७ मार्च २०२५ रोजी जुनी पेन्शन योजना लागू करावी, याबाबत सभागृहात मागणी लावून धरली.

* १९ मार्च २०२५ रोजी मुंबई येथे शिक्षण मंत्री श्री. दादाजी भुसे यांची भेट घेतली. दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजी शासन निर्णयानुसार शालेय शिक्षण विभागाने स्वतंत्र शासन निर्णय काढून शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

* दि. ११ जून २०२५ रोजी २ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार महाविद्यालयीन प्राध्यापकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत अवर मुख्य सचिव श्री. रेड्डी यांना निवेदन दिले.

* ७ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य अंशतः अनुदान प्राप्त (२००५ पूर्वी) शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या वतीने आझाद मैदान मुंबई येथे सदर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना व अन्य मागण्यांसाठी २ दिवसीय 'आर्त हाक' आंदोलनास भेट देऊन मार्गदर्शन केले.

* हिवाळी अधिवेशन २०२५ दरम्यान दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य जुनी पेंशन संघटनाद्वारे नागपूर येथे आयोजित पेन्शन जनक्रांती महामोर्चात सहभागी होऊन मार्गदर्शन केले.

* महाराष्ट्र राज्य पेन्शनग्रस्त शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने राज्यातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी संविधान चौक, नागपूर येथे १९ डिसेंबर २०२५ रोजी 'लक्षवेध धरणे' आंदोलनास भेट देऊन मार्गदर्शन केले.



**मुंबई**

२८ फेब्रुवारी २०२६ रोजी शिक्षणमंत्री श्री. दादाजी भूसे यांची भेट घेऊन निवेदन दिले.



नागपूर १२ डिसेंबर २०२५

* अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ मध्ये दि. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी सभागृहात केली.
